# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gamblers**

**Police Station** :- **SDPO Karanja**

**Date of Good Work done** :- **08/12/2022**

**Brief of the work done :-**

उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा पथकाचा जुगार अड्डयावर छापा ; 23 आरोपींवर कारवाई, 10 लाखांचा मुद्देमाल जप्त.

## मानोरा येथे जुगार अड्ड्यावर छापा

- १० लाख २७ हजार रुपये मुद्देमाल जप्त
- कारंजा पोलीस उपविभागीय अधिकारी यांची कारवाई



देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ▪ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शहरातील नाईक नगर येथील रणजित जाधव यांचे धरी बावन्न पते तास हार जितचा खेळ सुरू असल्याची गुप्त माहिती कारंजा पोलीस उपविभागीय अधिकारी जगदीश पांडे यांना मिळाली त्यांनी ७ डिसेंबर छापा टाकला असता २३ आरोपी यांच्या वर कारवाई करीत त्यांचे जवळून १० लाख २७ हजार ९९० रुपयाचा मुद्दे माल जप्त केला.

पोलीस सूत्राकडून प्राप्त माहिती नुसार मानोरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शहरातील नाईक नगर येथील रणजित जाधव यांचे घरी बावन्न पत्त्याचा तास एका बादशाह हा खेळ खेळून यावर हारजित सुरू असल्याची गुप्त माहिती कारंजा पोलीस उपविभागीय अधिकारी जगदीश पांडे यांना मिळाली , त्यांनी आठवडी बाजाराच्या दिवशी ७ डीसेबरला छापा टाकला असता घरात अंदर बाहरचा खेळ सुरू असताना पोलीस उपनिरीक्षक दिनकर महादेव राठोड यांचे फिर्यादी वरून आरोपी रणजित जाधव, श्रीमती उषा जाधव, नामदेव विठ्ठल राठोड, राजेश शिवलाल राठोड, हमजा बेग, मोरेश्वर मारासिंग राठोड, विवेक माणिक पवार, आकाश किसनराव, राजविर दीपक पवार, चंद्रकांत बाबाराव खरगडे,एरशाद अब्दुल मजीद, शेख सायर शेख छोटु, प्रवीण चरण चव्हाण, शेख अख्तर शेख लाल, प्रकाश देवमन बंड, अरुण रामराव चव्हाण, दयाराम रावजी राठोड, शेख निसार शेखलाल, महादेव लक्ष्मण किन्नकर, संतोष प्रल्हाद चव्हाण, मुकेश हिरामण चव्हाण, अजय फुलसिंग राठोड, जयचंद शाम राठोड यांचे विरुद्ध कलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली यात नगदी ३६ हजार ९९० ,सतरा मोबाईल किंमत ९१ हजार ३०० रुपये चार मोटार सायकल दोन चारचाकी वाहन किंमत ९ लाख रुपये असे एकूण १० लाख २७ हजार ९९० रुपयाची कारवाई केली ही कारवाई कारंजा पोलीस उपविभागीय अधिकारी जगदीश पांडे, पी.एस आय. दिनकर राठोड, पो.का विनायक देवधर, नंदकिशोर बच्चे, मदन पूनेवार, चंद्रकांत वाळके, फिरोज शेख, अविनाश खिराडे, निलेश थेर, मंगेश चौधरी, महिला पोलिस रुपाली लावरवार, कविता गुडदे यांनी केली अधिक तपास मानोरा पोलीस करीत आहे. (ता.प्र.)